P1

परिवहन आयुक्त कार्यालय,
प्रशासकीय इमारत,३रा व ४था मजला,
सरकारी वसाहत,वांद्रे (पूर्व),
मुंबई ४०००५१.

## जाहिर निविदा सूचना

परिवहन आयुक्त कार्यालयाच्या दैनदिन साफसफाईचे कामकाज कंत्राटी पध्दतीने करण्याबाबत जाहिर निविदा मागविण्यात येत आहेत.परिवहन आयुक्त कार्यालय हे प्रशासकीय ईमारत, वांद्रे (पूर्व) या ईमारतीत चौथा मजला पूर्ण व तिस-या मजल्यावरील अर्धा भाग यामध्ये कार्यन्वित असून या कार्यालयाच्या अखत्यारित तिसऱ्या व चौथ्या मजल्याच्या मधील जीन्यासहीत खालील प्रमाणे जागा वापरात आहे.

| | |
|---|---|
| चौथा मजला | १२,००० चौ फुट |
| तिसरा मजला | ६,००० चौ फुट |
| व्हरांडा | २,२५० चौ फुट |
| एकूण | २०,२६० चौ फुट |

वरील जागेमधील अधिकारी कक्ष/ अभिलेख कक्ष, लेखनसामग्री कक्ष अशी एकूण ५,२६५ चौ फुट जागा वगळून उर्वरित १४,९९५ चौ फुट इतक्या जागेचे व दोन्ही मजल्यावरील पुरुष व महिला प्रसाधन गृहे यांची दैनदिन स्वच्छता करण्यासाठी कंत्राटी पध्दतीने कामकाज करण्यासाठी जाहिर निविदा मागविण्यात येत आहेत.

वरील प्रमाणे दैनंदिन साफसफाईचे कामकाज कंत्राटी पध्दतीने करण्याबाबत निविदा सादर करणा-या संस्थेस अशा प्रकारच्या कामाचा एक वर्षाच्या पुर्वानुभवाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. या बाबतच्या निविदेचे कोरे फार्मची किंमत रु.५००/- असून सदर फॉर्म दि.१७.०१.२०१३ पासून दि.३०.०१.२०१३ पर्यत परिवहन आयुक्त कार्यालयातील रचना व कार्यपध्दती अधिकारी यांचेकडे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी २.०० पर्यत उपलब्ध होतील. पुर्णपणे भरलेल्या निविदा दि.३०.०१.२०१३ पर्यत परिवहन आयुक्त कार्यालयात रचना व कार्यपध्दती अधिकारी यांच्याकडे दुपारी ३.०० पर्यत सादर करण्यात यावे. तसेच इच्छुक निविदाकार रचना व कार्यपध्दती अधिकारी, परिवहन आयुक्त कार्यालय यांच्या परवानगीने वर नमुद केलेल्या जागेची पाहणी करु शकतील.

वरील विहित वेळेनंतर आलेल्या अथवा अर्धवट भरलेल्या निविदा स्वीकारण्यात येणार नाही. वरील कालावधीत प्राप्त झालेल्या निविदा उपस्थित निविदांकारासमोर दि.३०.०१.२०१३ रोजी दुपारी ४.०० वाजता उघडण्यात येतील.

कोणतीही निविदा स्वीकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार राखुन ठेवण्यात येत आहेत.

परिवहन उप आयुक्त (प्रशासन)
महाराष्ट्र राज्य, मुंबई